# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 303/2022 दिनांक : 06.08.2022

## 1)घरफोडी :-

**धर्माबाद :-** दिनांक 04.08.2022 रोजी 22.30 ते दिनांक 05.08.2022 रोजी 02.30 वा. चे दरम्यान, फिर्यादीचे घरी मौजे राजापुर ता. धर्माबाद जि. नांदेड येथे, यातील फिर्यादीचे व गावातील ईतर चार लोकांचे घराचे कुलूप तोडुनघरात प्रवेश करून घरातील सोन्या-चांदीचे दागीने नगदी असा एकुण किंमती 2,04,200/-रूपयाचा ऐवज काणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरुन नेला. वगैरे फिर्यादी मारोती साईनाथ जंगेवाड, वय 32 वर्षे, व्यवसाय शेती रा. राजापुर ता. धर्माबाद जि. नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे धर्माबाद गुरन 176/2022 कलम 457,380,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोउपनि/श्री विजय पंतोजी, मो.क्रं. 9421761274 हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :-

**1)भाग्यनगर :-** दिनांक 18.07.2022 रोजी 22.30 वा. ते दिनांक 19.07.2022 रोजी 04.00 वा. चे दरम्यान, फिर्यादीचे घरासमोरुन सरस्वती निवास तिरुमला नगर डी मार्ट जवळ, नांदेड येथे, यातील फिर्यादीची पॅशन प्रो कंपनीची निळया रंगाची मो. सा. क्रं. एमएच-26/बीके-4282 किंमती 30,000/- रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे फिर्यादी दिपक गंगाधर जाधव, वय 40 वर्षे, रा. सरस्वती निवास तिरुमला नगर डी मार्ट जवळ, नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे भाग्यनगर गुरन 217/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोह/2014 सिरसाट, मो.क्रं. 9423306245 हे करीत आहेत.

**2)वजिराबाद :-** दिनांक 03.07.2022 रोजी 03.00 वा. चे सुमारास, चौधरी पेट्रोलपंपा समोर, नांदेड येथे, यातील फिर्यादीची स्पेलंडर प्लस कंपनीची मो.सा. क्रं. एमएच-26/बीयु-2013 किंमती 50,000/- रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. वगैरे फिर्यादी रिशी सुनिल कुलकर्णी, वय 22 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. सिडको, नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे वजिराबाद गुरन 271/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोना/11 सोनटक्के, मो.क्रं. 8805007511 हे करीत आहेत.

**3)नांदेड ग्रामीण :-** दिनांक 02.08.2022 रोजी 14.00 वा. ते 14.30 वा. चे दरम्यान, सरकारी दवाखाना विष्णुपुरी, नांदेड येथे, यातील फिर्यादीची स्पेलंडर प्लस कंपनीची मो.सा. क्रं. एमएच-26/बीएम-6668 किंमती 20,000/- रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे फिर्यादी ठकोजी ब्रम्हाजी शिंदे, वय 44 वर्षे, व्यवसाय शेती रा. रोहीपिंपळगाव, ता. मुदखेड जि. नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे नांदेड ग्रामीण गुरन 478/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोह/2391 रामदिनवार, मो.क्रं. 9545515510 हे करीत आहेत.

**4)विमानतळ :-** दिनांक 04.08.2022 रोजी 09.00 वा. ते 12.15 वा. चे दरम्यान, श्यामनगर, नांदेड येथे, यातील फिर्यादीची हिरो होंडा ग्लॅमर कंपनीची मो.सा. क्रं. एमएच-26/वयु-8453 किंमती 30,000/- रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे फिर्यादी संघरत्न अशोक पंडीत, वय 32 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. श्रावस्तीनगर, नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे विमानतळ गुरन 275/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोह/967 गायकवाड, मो.क्रं. 9529796606 हे करीत आहेत.

## 3)चोरी :-

**1)सिंदखेड :-** दिनांक 03.08.2022 रोजी 08.00 वा. चे सुमारास, गोकुळ गोंडेगाव शिवारातील फिर्यादीचे शेतात ता. माहुर जि. नांदेड येथे, यातील फिर्यादीचे शेतातील विहरीवरील पाण्याची विद्युत मोटार तीन एच.पी. किंमती 15,000/-रूपयाची कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे फिर्यादी प्रेमचंद दशरथ जाधव, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. हरडप ता. माहुर जि. नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे सिंदखेड गुरन 95/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोहेकॉ/2356 दारासिंह गंगासिंह चौहाण, मो.क्रं. 7350860891 हे करीत आहेत.

**2)सिंदखेड :-** दिनांक 20.07.2022 रोजी 15.00 वा. चे सुमारास, मौजे करळगांव येथील फिर्यादीचे शेतात ता. माहुर जि. नांदेड येथे, यातील फिर्यादीचे शेतातील धुऱ्यावर ठेवलेली बोरवेलची पाण्याची विद्युत मोटार पाच एच.पी. किंमती 20,000/-रूपयाची यातील नमुद दोन चोरटयांनी संगणमत करुन चोरुन नेली. वगैरे फिर्यादी मुरलीधर उत्तम राठोड, वय 48 वर्षे, व्यवसाय शेती रा. हरडप ता. माहुर जि. नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे सिंदखेड गुरन 93/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोना/2471 गजानन रामा कुमरे, मो.क्रं. 7744002471 हे करीत आहेत.

CS Scanned with CamScanner

## 4)रेती चोरी :-

**हदगाव** :-दिनांक 05.08.2022 रोजी 08.30 वा. चे सुमारास, उखळा आश्रमाजवळ मैदान कदमनगर हदगाव ता. हदगाव जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने विनापरवाना बेकायदेशीर रित्या ट्रक क्रं. एम.एच.-26-एडी-4955 किंमती 15,000.00/-रुपयाचा व त्यामध्ये लाल रेती किंमती 15,000/-रुपयाची असा एकुण 15,150.00/-रुपयाचे मालासह चोरीटी विक्री करण्याचे उदेशाने ट्रक सह वाहतुक करताना मिळुन आला. वगैरे फिर्यादी पोका/3029 सतीश गोपीनाथ कंद्रे, ने. पोस्टे हदगाव यांनी दिलेल्या फिर्याद वरुन पोस्टे हदगाव गुरनं 244/2022 कलम 379 भादवी सह कलम 48 जमीन महसुल अधिनियम 1966 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून तपास सपोनि/श्री भोसले, मो.क्र. 9552591244 हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :-

**विमानतळ** :- दिनांक. 03.08.2022 रोजी 20.00 वा. ते 20.30 वा. चे दरम्यान, आई ढाबा सांगवी, नांदेड येथे, यातील फिर्यादी व त्याचे सोबतचे लोक नमुद ठिकाणी जेवण करीत असताना कच्चा चपात्याचे कारणावरुन ढाबा मालक व इतर नमुद चार आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीस रॉडने, काठीने डोक्यात, हातावर, पायावर, पाठीवर मारुन गंभीर जखमी केले व फिर्यादीचे सोबतचे भांडण सोडवणारे यांना शिवीगाळ करत लाथा बुक्यांनी मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे फिर्यादी शंकर रामचंद्र कलवले वय 35 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. पांडुरंगनगर, नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे विमानतळ गुरनं 274/2022 कलम 326,143,147,148,149,323,504,506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोउपनि/श्री बुरकुले, मो.क्रं. 9683652730 हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :-

**नायगाव** :- गेल्या दोन वर्षापासुन ते आज पावेतो, आरोपीचे घरी खंडगाव ह.मु. गोदमगाव ता. नायगाव जि. नांदेड येथे, यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस कोणतेही कारण लावुन शिवीगाळ करुन मानसिक त्रास देवुन मारहाण केली व चारित्र्यावर संशय घेवून माहेरी हाकलुन दिले फिर्यादीचे आई वडील व इतर नातवाईक समजावुन सांगण्यास गेले असता त्यांना शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे फिर्यादी 30 वर्षीय महिला यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे नायगाव गुरनं 119/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोह/2006 मुस्तापूर. मो.क्रं. 9325850996 हे करीत आहेत.

## 7)फसवणुक :-

**सिंदखेड** :- दिनांक 27.04.2022 रोजी पासुन पुढे, मौजे सिंदखेड ता. माहुर जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीहा सन 2011 ते 2012 व सन 2019 ते 2020 या दरम्यान ग्रामपंचायत सिंदखेड उपसरपंच या पदावर कार्यरत होता व तो सध्या ग्रामपंचायत सदस्य आहे. सन 2011 ते 2012 मध्ये रमाई आवास योजनेचा लाभ घेवून परत सन 2019 व 2020 मध्ये परत रमाई आवास योजनेतुन घरकुलाचा लाभासाठी 15,000/- रुपयाची उचल करुन एकाच योजनेतुन दोन वेळा लाभ घेवून शासनाची फसवणुक केली. वगैरे वरुन मा.न्यायालयाचे आदेशाने प्रमाणे सी.आर.पी.सी. कलम 156 (3) प्रमाणे गुन्हा दाखल. फिर्यादी दत्ता संभा मुरखे, वय 62 वर्षे, रा. व्यवसाय शेती रा. सिंदखेड ता. माहुर जि. नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे सिंदखेड गुरन 94/2022 कलम 467,468,471,420 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोना/2188 कोंडापलकुलवार, मो.नं. 9822436834 हे करीत आहेत.

## 8)जुगार :-

**लोहा** :- दिनांक 05.08.2022 रोजी 17.10 वा. चे सुमारास, टाईन ज्युस सेंटर च्या बाजुस बस स्टॅन्ड जवळ लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 2120/-रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे फिर्यादी पोह/408 अशोक माधवराव कंद्रे, ने. पोस्टे लोहा यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे लोहा गुरनं 154/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून तपास पोह/1754 सुर्यवंशी, मो.क्र. 7057524134 हे करीत आहेत.

## 9)प्रोव्हिबीशन :-

**देगलुर** :- दिनांक 05.08.2022 रोजी 16.10 वा. चे सुमारास, शिवनंद फुट वेअर चे मागील पत्राचे शेड मध्ये मौजे तमलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारु किंमती 2400/-रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे फिर्यादी पोकॉ/580 कृष्णा गंगाराम लामतुरे, ने. पोस्टे देगलुर यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे देगलुर गुरनं 370/2022 कलम 65 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोह/1984 सकनुरे, मो.क्र. 9821159844 हे करीत आहेत.

CS Scanned with CamScanner

## 10)गळफास घेवुन मृत्यु :–

**हदगाव :–**दिनांक 04.08.2022 रोजी 17.00 वा. चे सुमारास, शेतातील वसरीत मौ. काळेश्वर ता. हदगांव जि. नांदेड येथे, यातील मयत नामे गजानन मारोतराव जाधव, वय 40 वर्षे, रा. काळेश्वर ता. हदगाव जि. नांदेड, यांनी त्यांचे शेतात शेडच्या वरांडीत बैलाचा कासरा घेवून गळफास घेऊन आत्महत्या केली. वगैरे खबर देणार बाळासाहेब मारोतराव जाधव, वय 38 वर्षे, व्यवसाय शेती रा. काळेश्वर ता. हदगाव जि. नांदेड यांनी दिलेल्या खबरीवरुन पोस्टे हदगाव आ. मृ. 36/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोह/1863 कादर, मो.नं. 9860202126 हे करीत आहेत.

## 11)पाण्यात बडुन मृत्यु :–

**हिमायतनगर :–**दिनांक 04.08.2022 रोजी 22.00 वा. ते दिनांक 05.08.2022 रोजी 08.00 वा. चे दरम्यान, मधुकर राठोड यांच्या विहरीत मौजे लाईन तांडा ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे, यातील मयत नामे अंकुश कैलास राठोड, वय 28 वर्षे, रा. लाईन तांडा ता. हिमायतनगर जि. नांदेड, यांनी मागील तिन वर्षापासुन नापिकी झाली, यावर्षी पण अति पाऊस पडल्याने शेतात पेरलेले सोयाबीन,कापसाचे पीक भिजुन गेले व शेतातील अर्धे पीक पाऊसाच्या पुराने पाण्यात वाहुन गेले याच चिंतेत व बँकेचे घेतले कर्ज कसे फेडावे म्हणुन परेशान होवून त्यांनी गावातील विहीरीत पडुन पाण्यात बडुन मरण पावला. वगैरे खबर देणार नामदेव किशन राठोड, वय 28 वर्षे, रा. लाईन तांडा ता. हिमायतनगर जि. नांदेड, यांनी दिलेल्या खबरीवरुन पोस्टे हिमायतनगर आ. मृ. 24/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोना/1966 आऊलवार, मो.नं. 9763255035 हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

CS Scanned with CamScanner

# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड   जा.क्र. 302/2022          दिनांक : 06.08.2022**

**नांदेड पोलीस दलातर्फे अमृत महोत्सव अनुषंगाने विवीध कार्यक्रमाचे आयोजन...**

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सव अनुषंगाने नांदेड पोलीस दलातर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पोलीस अधिक्षक मा. **श्री प्रमोद शेवाळे** यांचे मार्गदर्शनाखाली संपुर्ण नांदेड जिल्हयातील विविध शाखा, पोलीस स्टेशन, उप विभाग यांचे माध्यमातुन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रत्येक विभाग व पोलीस स्टेशन स्तरावर शाळेत, महाविद्यालय येथे जावुन प्रबोधनपर कार्यक्रम घेण्यात येत असुन विद्यार्थी व नागरीकांना पोलीस दलातर्फे विविध विभागाची माहिती प्रबोधनपर देण्यात येत आहे. मुली व महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी दामीनी पथक, भरोसा सेल व विविध टिम शाळा/कॉलेज वर जावुन सायबर गुन्हया बाबत माहिती देण्यात येत आहे. मुलीसाठी बॅड टच, गुड टच या बाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. वरिष्ठ नागरीकांसाठी आपल्या अडचणीच्या वेळी देण्यात येणारी मदत तसेच नागरीक व मुला मुलकरीता वाहतुक नियामांचे पालन करण्याबाबत प्रबोधन करण्यात येत आहे. पोलीस विभागातर्फे जनतेला अडचणीच्या वेळी तात्काळ मदत देण्यासाठी डायल 112 कार्यान्वयीत करण्यात आली असुन त्याचे काम नांदेड जिल्हा व पुर्ण महाराष्ट्रात सुरू असुन त्याची माहिती, तसेच शाळा कॉलेज येथील मुलांसाठी शस्त्राची माहिती देण्यात येत आहे.

दिनांक 25.07.2022 पासुन ते दिनांक 14.08.2022 पर्यंत 75 कि.मी. दौड चे आयोजन करण्यात आले असुन पोलीस अधिक्षक कार्यालय व जिल्हयातील हजर संख्येच्या 20% पोलीस अधिकारी व अंमलदार दररोज यामध्ये भाग घेत असुन दिनांक 14.08.2022 रोजी 10 कि.मी. दौड चे आयोजन करुन एकुण 75 कि.मी. दौड पुर्ण करुन समारोप करण्यात येणार आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

CS Scanned with CamScanner